
Late Ramesh Warpudkar College
Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

# प्रिंटिंग एरिया

Issue-75, Vol-01, April 2021

International Peer Reviewed Multilingual Research Journal




Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

14) Understanding Human Security: Through the Narratives of Global Human ...
RAJU DAN ||82

15) History of Agriculture in India : A Critical Analysis
Rekha Kumari, Bodh-Gaya ||89

16) Socio-Economic Conditions of Manual Scavengers
Ms. Sharmishtha Solanki, Anand, Gujarat ||92

17) STUDY THE EFFECTS OF VARIOUS AUTONOMIC DRUGS ON FISH MELANOPHORES
Dr. Rekha Yadav, Gwalior (M.P.) ||97

18) महाराष्ट्र राज्याच्या विकासात स्त्रियांची भूमिका
प्रा.भांडवलकर बी.एन., ता.जि.बीड ||103

19) आदर्श अनुवादक गुणवैशिष्ट्ये
डॉ.सुरेश शिंदे, जि.लातूर ||105

20) महाराष्ट्र राज्याचा औद्योगिक विकास: एक विभागवार अभ्यास
बेलुरे विशाल चंद्रशेखर, जिल्हा नांदेड ||108

21) २१ वीं सदी की कहानी में वृध्द विमर्श अंतिम आस–जिंदगी उदास
डॉ. राजश्री भामरे, जि.लातूर (महाराष्ट्र) ||111

22) तुका झालासे कळस
प्रा.डॉ. रंजाभाऊ भाऊसाहेब धायगुडे, जि.बीड ||114

23) परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील ...
डॉ.सुनिता आत्मारामजी टेंगशे & प्रा. विलास सोमा पवार, जि. हिंगोली ||118

24) गडचिरोली जिल्हयाच्या विकासातील आर्थिक समस्या व औद्योगिक स्थितीचे ...
डॉ. जी. जी. गोंडाने & संजय भास्कर मेश्राम, अकोला ||124

25) 'खाणकामव्यवसायामुळे निर्माण झालेली पुरस्थिती व पुरनियंत्रणाचा सविस्तर ...
महेश प्रभाकर रत्नपारखी, जिल्हा जालना ||129

26) श्री. कन्हैयालाल महाराज तीर्थक्षेत्र आमळी ता. साक्री, जि. धुळे
डॉ. शशीकांत गोकुळ साबळे, नाशिक ||134

27) २००० नंतरच्या भटक्या विमुक्त जमातींच्या आत्मकथनांचे बदलते स्वरूप
श्री. राजकुमार बबन शेलार, जि. पुणे ||137

28) नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक नुकसानीवर शासनाने राबविलेल्या ...
डॉ. अभिजीत वि. वेरुळकर, जि. वर्धा ||140

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

Late Ramesh Warpudkar College Sonpeth Dist. Parbhani (M.S.)

23

# परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या समस्या

**डॉ.सुनिता आत्मारामजी टेंगशे**
विभाग प्रमुख तथा संशोधक मार्गदर्शक,
समाजशास्त्र विभाग,
कै.रमेश वरपूडकर महाविद्यालय, सोनपेठ, जि.परभणी

**प्रा. विलास सोमा पवार**
समाजशास्त्र विभाग,
आदर्श महाविद्यालय, हिंगोली, जि. हिंगोली

**प्रस्तावना :**

भारतातील बंजारा समाज हा दुर्गम आणि दऱ्याखोऱ्यात आढळून येणाऱ्या तांडयामध्ये शतकानुशतकापासून जीवन जगत आलेला समाज आहे.निसर्गरम्य वातावरणात जीवन निर्वाह करणाऱ्या आणि प्रथा—परंपरा मानणाऱ्या बंजारा समाजात आर्थिक सामाजिक व शैक्षणिक स्तरावरील बहुसंख्य असणाऱ्या समस्या अत्यंत गंभीर आणि तीव्र स्वरूपाच्या आहेत.

परिवर्तन हा निसर्गाचा स्थायीभाव असून भारतात वास्तव्याला असणारा बंजारा समाज या परिवर्तना पासून अलिप्त नाही पारंपरिक बंजारा समाजात आज बऱ्याच प्रमाणात बदल घडून येत आहेत मात्र पारंपरिक बंजारा समाजातील सामाजिक समस्यांनी आजच्या आधुनिक काळात नवा चेहरा धारण केलेला आहे. समाजव्यवस्थेतील व्यक्तींच्या विपथगामी वर्तनाने काही नवीन समस्या जन्माला आलेल्या आहेत या सामाजिक समस्या आज सातत्याने विकासाच्या मार्गात अडथळा ठरू पाहत आहेत. बंजारा समाजामध्ये अस्तित्वात असलेल्या विविध सामाजिक समस्यापैकी शैक्षणिक समस्या ही एक महत्त्वपूर्ण सामाजिक समस्या बनलेली आहे. मागासवर्गीय आणि दुर्बल घटकातील मुला—मुलींना समाज विकासाच्या परिवर्तन प्रक्रियेत आणून त्यांचा सामाजिक आर्थिक आणि विशेषत: शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी विकास कार्यक्रमांतर्गत विशेष जिल्हा समाज कल्याण विभागामार्फत डोंगराळ व दुर्गम भागात राहणाऱ्या विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी—सुविधा मिळाव्यात यादृष्टीने निवासी आश्रमशाळा सुरू करण्यात आलेल्या आहेत मात्र विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी निवासी आश्रमशाळा असूनही याची योग्य ती चौकशी करून अशा निवासी वसतिगृह असलेल्या आश्रम शाळामध्ये आपल्या मुला—मुलींना ठेवले जात नसल्यामुळे शिक्षणाचे लोन या समाजापर्यंत पोहोचले नाहीत या समाजातील पालक व्यवसायाच्या निमित्ताने गावोगावी भटकत असले तरी त्यांच्या मुलांना निवासी आश्रमशाळेत पाठवावेत असे विशेष यंत्रणेकडून ठोस प्रयत्न झालेले नाहीत. शिक्षणाचे फायदे कोणते याची कल्पना शासन स्तरावरून या समाजातील लोकांना देण्यात आलेली नाही म्हणून या समाजातील विद्यार्थी बहुसंख्य प्रमाणात शिक्षणापासून वंचित राहिले याशिवाय रूढी, परंपरा, अज्ञान, अंधश्रद्धेच्या आहारी गेलेल्या बंजारा समाजातील लोकांनी आपल्या मुलांना शाळेत पाठविले नाही यामुळेच बंजारा समाजातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहिल्याचे दिसून येतात.

आज बंजारा समाजातील अनेक मुले मुली शिक्षणाच्या सोयी सुविधेमुळे तांड्यातून बाहेर पडत आहेत नोकरी व्यापार यासारख्या व्यवसायात ते उतरलेले आहेत परंतु गरिबी दारिद्र्य आणि अज्ञान यामुळे या समाजातील बहुसंख्य मुले मुली आजही शिक्षणापासून वंचित राहिलेले आढळून येतात .अनेक वर्षापासून अव्याहतपणे भ्रमंती करणारा गोर बंजारा समाज हा आता जरी काही प्रमाणात स्थिरावला असला तरी आपल्या गौरवशाली बंजारा परंपरेचा इतिहास आणि आठवणी, संस्कृती तो जरूर सांभाळत आहे.थोडक्यात प्रस्तुत शोधनिबंधामध्ये परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील निवासी आश्रमशाळामधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचा अभ्यास करण्यात आलेला असून निवासी आश्रमशाळामध्ये शिक्षण घेणाऱ्या

वसतिगृह निवासी असलेल्या विद्यार्थ्यांच्या आश्रम शाळेतील शैक्षणिक असुविधा आणि वसतीगृहामधून दिल्या जाणाऱ्या सोयी—सुविधांना अभाव याबाबत वस्तीग्रह निवासी विद्यार्थ्यांच्या अनेक अडचणी आणि समस्या गंभीर स्वरूपाच्या आहेत त्याचा अभ्यास पुढील प्रमाणे केलेले आहे.

**१) विद्यार्थ्यांची शैक्षणिक गळती व अपव्यय:—**

निवासी आश्रमशाळामधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण अधिक असल्याने दिसून येते. शैक्षणिक गळती किंवा अपव्यय म्हणजे विद्यार्थी प्राथमिक शाळेत दाखल झाल्यानंतर त्यांचे कायम स्वरूपाची साक्षरता प्राप्त करण्यापूर्वीच शाळा सोडणे होय. आणि अपव्यय म्हणजे शिक्षणावर होणारा खर्च व मानवी प्रयत्न वाया जाणे यालाच अपव्यय असे म्हणतात. याला निवासी आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थी अपवाद नाहीत या निवासी आश्रमशाळेत शिकणाऱ्या बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण ४० टक्के पेक्षा अधिक आहे तर प्राथमिक माध्यमिक आणि उच्च माध्यमिक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळती कमी अधिक प्रमाणात असली तरी विशेषत: उच्च माध्यमिक निवासी आश्रमशाळेतील बंजारा समाजामधील विद्यार्थी गळतीचे प्रमाण ८३ टक्के पेक्षा अधिक आहे म्हणजेच प्राथमिक आणि माध्यमिक शाळेच्या तुलनेत उच्च माध्यमिक आश्रमशाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण जास्त आहे.

निवासी आश्रमशाळामधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीला पालकांची गरिबी आणि दारिद्र्य हे घटक कारणीभूत तर आहेतच परंतु बहुतांशी प्रमाणात पालकांचे साखर कारखान्यातील ऊसतोडणी सारखे फिरते व्यवसाय अधिक जास्त प्रमाणात या समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीला जबाबदार असल्याचे दिसून येते सामान्यत: विद्यार्थी गळतीचे अनेक कारणे कारणीभूत असतात त्यापैकीच प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक, परिस्थितीजन्य, शालेय व्यवस्थापन, सोयी—सुविधांचा अभाव इत्यादी काही बोलकी कारणे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीसाठी कारणीभूत असल्याचे सांगता येतात.

२) शैक्षणिक असंतोष किंवा उदासीनता:—

निकराच्या अनेक समस्यांपैकी शिक्षणाचा प्रश्न आधुनिक लोकशाहीला सतत आव्हाने देत आहे भारताला स्वातंत्र्य मिळून आज अनेक वर्ष पूर्ण झाली तरी अजूनही भारतातील शिक्षण प्रणाली मात्र ब्रिटिश शासन काळातीलच आहे काही राज्यात नवीन शिक्षणक्रम राबविण्यास सुरुवात झाली असली तरी या पद्धतीचा तोंडावळा जुन्या ब्रिटिश शिक्षण प्रणालीशीच मिळताजुळता आहे व्यवसायिक शिक्षण व तांत्रिक शिक्षणाला या पद्धतीत विशेष स्थान मिळू शकलेले नाही औपचारिक शिक्षण घेतलेली कोणतीही व्यक्ती शारीरिक श्रम करण्यास कचरत आहे बहुसंख्य व्यक्तींचा उद्देश हा शिक्षणामुळे नोकरी करणे हाच असतो पण तांत्रिक किंवा व्यावसायिक शिक्षणाचा अभाव असल्यामुळे आजही कुशल कारागीर विपुल प्रमाणात मिळत नाहीत आणि दुसरीकडे मात्र सुशिक्षित बेकारांची फौज निर्माण होत आहे. मुळातच बंजारा समाज हा रूढी, प्रथा—परंपरा मानणारा असल्यामुळे आणि या समाजात अज्ञान—अंधश्रद्धा अधिक जास्त प्रमाणात असल्यामुळे शैक्षणिक उदासीनता या समाजात जास्त प्रमाणात दिसून येते निरक्षरतेचे प्रमाण या समाजामध्ये अधिक असल्यामुळे शिक्षणाचे महत्त्व बंजारा समाजातील लोकांना कळालेले नाहीत. तळागाळातल्या सर्व लोकांसाठी शिक्षणाची व्यवस्था राबविली जात असली तरी तिचा योग्य वापर झालेला नसल्यामुळे शिक्षणाविषयी या समाजात उदासीनता आहे. पात्रताधारक, प्रशिक्षित जिज्ञासू,शिक्षकांची कमतरता, आधुनिक शिक्षण प्रणाली व तंत्रज्ञानाचा अभाव, शिक्षण संस्थेतील राजकीय हस्तक्षेप, आई—वडिलांचा आपल्या पाल्या बाबत शैक्षणिक दूरदृष्टीचा निष्काळजीपणा इत्यादीमुळे शैक्षणिक असंतोष आणि उदासीनता मोठ्या प्रमाणात या समाजात पहावयास मिळते तसेच बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या पालकांना आजची शिक्षण पद्धती ही दोष पूर्ण वाटते कारण शिक्षणातून आजही सुशिक्षित बेकार मोठ्या प्रमाणावर आढळून येतात हे शिक्षण रोजगाराभिमुख नाही म्हणून सध्याच्या ब्रिटिश कालीन परंपरेवर आधारलेली शिक्षण पद्धती बदलून त्याऐवजी सुधारित

रोजगाराभिमुख शिक्षण पद्धतीचा अनुलंब केला जावा जेणेकरून शैक्षणिक असंतोष आणि शैक्षणिक उदासीनता कमी करण्यासाठी मदत होईल.

३) पालकांचा निम्न आर्थिक स्तर : –

समाज जीवनाच्या विविध क्षेत्रात सुशिक्षित, संस्कारक्षम आणि ज्ञानी मनुष्यबळ आवश्यक आहे यासाठी शिक्षणासारखे दुसरे साधन नाही. शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांची सर्वांगीण जडणघडण करण्यासाठी पालकांचा आर्थिक स्तर हा अत्यंत महत्त्वाचा घटक समजला जातो. परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील आश्रम शाळामधून शिक्षण घेणाऱ्या बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या बहुसंख्य पालकांचा व्यवसाय हा साखर कारखान्यांमध्ये ऊसतोडणीचे काम व मजुरी हाच आहे अशा प्रकारच्या व्यवसायातून स्वत:चे चरितार्थ चालविणे अवघड जात असल्यामुळे आपल्या पाल्यांच्या शिक्षणाचा विचार तर हा समाज दूरचा समजतो या व्यवसायातून मिळणारे मासिक उत्पन्न हे अतिअल्प असल्यामुळे व हा व्यवसाय मुळात फिरता असल्यामुळे आपल्या मुलामुलींच्या शैक्षणिक विकासाकडे हा समाज दुर्लक्ष करतो म्हणून आजच्या स्थितीत या समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण जास्त आहे.

आजच्या आधुनिक काळात सर्वत्र शैक्षणिक सुविधा उपलब्ध असतानाही बंजारा समाजातील मुले–मुली प्राथमिक शिक्षणापासून वंचित असल्याचे दिसून येते याचे प्रमुख कारण म्हणजे पालकांचा निम्न आर्थिक स्तर हाच आहे.याच बरोबर या समाजातील अनेक पालक आपल्या आर्थिक अडचणीमुळे आपल्या पाल्यांचा शिक्षण अर्ध्यातच बंद करून त्यांनाही आपल्या व्यवसायात गुंतवून घेत असल्याचे आढळून येते आज सर्वत्र विज्ञानाचे वारे वाहत असताना बंजारा समाज हा अंधार युगात वावरत आहे हा समाज आजही पारंपारिक रूढी प्रथा परंपरा अभिमानी राहिलेला आहे यामुळे या समाजाला आजही शैक्षणिक महत्त्व पटलेले नाहीत सध्याच्या स्थितीत या समाजातील काही पालका जवळ स्वत:ची शेती किंवा नोकरी आहे अशाच पालकांचे विद्यार्थी उच्च शिक्षणापर्यंत पोहोचलेली आहे परंतु ज्या पालका जवळ स्वत:ची शेती किंवा नोकरी नाही अशा पालकांची मुले आजही शिक्षणापासून वंचितच आहेत. मुळात बंजारा समाज हा डोंगराळ अतिदुर्गम भागात राहून आणि फिरता व्यवसाय करणारा असल्यामुळे आपल्या पाल्यांच्या शिक्षणाकडे हा समाज दुर्लक्ष करत आहे आज काही अंशी हा समाज स्थिरावलेला असला तरी बहुसंख्य लोक आजही भटकंती करून आपला उदरनिर्वाह करत असल्याचे दिसून येते.

थोडक्यात, शैक्षणिक विकासामध्ये सर्वात जास्त अडसर ठरणार या विविध बाबींपैकी पालकांचा निम्न आर्थिक स्तर हा एक महत्त्वाचा घटक आहे म्हणून या समाजाचा शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी शासनाला विशेष अशा सुविधांचे नियोजन करून बंजारा समाजातील पालकांचा आर्थिक स्तर कसा उंचावता येईल याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

४) आरोग्य तपासणीची समस्या : –

आर्थिक मागासलेपणा व अस्थिर राहणी पद्धतीमुळे विमुक्त जाती व भटक्या जमातीतील पालकांना आपल्या मुलांच्या शिक्षणाची सोय करता येत नाही अशा भटक्या अवस्थेत जीवन जगणाऱ्या पालकांच्या मुलासाठी मोफत राहणे– खाणे व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध असलेल्या निवासी आश्रमशाळेची सोय या समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासासाठी करण्यात आलेल्या आहेत या निवासी आश्रमशाळेत आर्थिक दृष्ट्या गरीब मुला–मुलींना मोफत शैक्षणिक सुविधा मिळत असल्यामुळे येथे त्यांचे प्रवेश घेण्यात येते अशा आश्रमशाळेतून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच आरोग्याची काळजी घेणे बंधन कारक असते परंतु अनेक आश्रमशाळेतून दर महिन्याला विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी होत नसल्यामुळे अनेक विद्यार्थी आजारी पडतात या आजारातून ते सावरू शकत नाहीत म्हणून ते कायमचे शाळा सोडून जातात आणि शैक्षणिक गळतीची समस्या निर्माण होते.

आश्रमशाळांमधून शिकणाऱ्या वस्तीगृह निवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन आरोग्याची काळजी म्हणून दर महिन्याला वसतिगृह निवासी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी होणे आश्रमशाळा संहितेच्या नियमानुसार अत्यंत गरजेचे असते निवासी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला जाणारा अल्पोपहार व आहार दर्जा उत्कृष्ट

असेल तर विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण कमी असते परंतु ज्या निवासी आश्रमशाळेतील वसतिगृहाद्वारे विद्यार्थ्यांना दिला जाणारा अल्पोपहार व आहार दर्जा निकृष्ट असेल तर त्या त्या आश्रमशाळेतील वसतिगृह निवासी विद्यार्थी आजारी पडण्याचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे दिसून येते वारंवार जुलाब, उलट्या इत्यादी आजारामुळे विद्यार्थी हैराण होताना दिसतात यावरून परभणी आणि हिंगोली जिल्ह्यातील आश्रमशाळांमधून शिकत असलेल्या बंजारा समाजातील विद्यार्थ्यांची समस्या आरोग्याच्या बाबतीत गंभीर स्वरूपाची आहे. कारण प्रत्येक आश्रमशाळेतून वस्तीगृह निवासी विद्यार्थ्यांची दर महिन्याला नियमितपणे आरोग्य तपासणी होणे गरजेचे असतानाही या जिल्ह्यातील आश्रमशाळेतून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची नियमित आरोग्य तपासणी केली जात नसल्याचे दिसून येते ही एक आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचीच नव्हे तर त्यांच्या पालकांच्या समस्येत भर टाकणारी समस्या बनलेली आहे कारण आरोग्य खर्चाचा भार शाळेला नव्हे तर पालकांना सोसावा लागतो म्हणून ते चिंताग्रस्त बनलेले आहेत.

५) निवासीआश्रमशाळेतील **सोयी— सुविधा व सवलती विषयक समस्या : —**

गरिबी, दारिद्र्य, आर्थिक मागासलेपणा आणि भटकी राहणी पद्धतीमुळे बंजारा समाजातील पालकांना आपल्या मुला— मुलींच्या शिक्षणासाठी आश्रमशाळेचा आधार घ्यावा लागतो. अशा निवासी आश्रमशाळांना शासनाद्वारे आर्थिक सहाय्य देण्यात येते अशा आश्रमशाळांमधून शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत राहण्याची— खाण्याची 'व इतर शैक्षणिक साहित्याची सोय करण्यात येते अशा आश्रमशाळेत पहिल्या वर्षी पहिली व दुसरी असे दोन वर्ग उघडण्यात येतात व त्यामध्ये तीस निवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो व नंतर प्रत्येक वर्षी पुढील एक वर्ष एक वर्ग उघडण्यात येते त्यात २० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो अशा पद्धतीने आश्रमशाळेत इयत्ता सातवी पर्यंत वर्ग उघडून १२० निवासी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाल्यानंतर आश्रमशाळा पूर्ण विकसित झाली असे समजण्यात येते आश्रमशाळेची श्रेणी वाढ होऊन पुढे पोस्टबेसिक आश्रमशाळेत रूपांतर होते या पोस्टबेसिक आश्रम शाळेतही एकूण तीस निवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येतो असे असले तरी हे आश्रमशाळेतील अपुऱ्या सोयी व सुविधा आणि सवलतीमुळे या समाजातील अनेक मुले मुली शाळेत येत नाहीत किंवा जे येतात तेही आपले शिक्षण पूर्ण करीत नाहीत.

बंजारा समाजामध्ये आज पर्यंत अतिअल्प लोक साक्षर राहिलेले आहेत याचे कारण म्हणजे अज्ञान, दारिद्र्य, भटकी प्रवृत्ती शिक्षणाची नावड अंधश्रद्धा इत्यादी बाबी याची बोलकी कारणे दिसून येतात म्हणून या समाजातील मुलांना उपजीविकेच्या जबाबदारीसह ताब्यात घेऊन त्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण दिले गेले पाहिजे परंतु प्रत्यक्षात आज मात्र असे दिसून येत नाही आज संपूर्ण राज्यात भटक्या—विमुक्तांच्या निवासी आश्रमशाळेचे प्रमाण अतिअल्प आहे समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक मागासलेपणा व भटके जीवनपद्धतीमुळे बंजारा समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अवघड जात गेले. आज तळागाळातल्या सर्व लोकांसाठी शिक्षणव्यवस्था राबविली जात असली तरी तिचा योग्य वापर झालेला नसल्यामुळे या समाजात शिक्षणाविषयी उदासीनता आहे शासनस्तरावरून निवासी आश्रमशाळांना पुरविण्यात येणाऱ्या सोयी— सुविधा अपुऱ्या ठरतात त्यातही समाज कल्याण विभागाच्या अधीनस्थ चालणाऱ्या आश्रमशाळांचे अनुदान आणि विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सोयी— सुविधांचा अभाव असल्यामुळे निवासी विद्यार्थ्यांच्या समस्यात भर पडत जाऊन विद्यार्थी शाळा सोडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे निवासी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची जागेची अडचण, प्रशिक्षित व जिज्ञासू शिक्षकांची कमतरता, अपुरे क्रीडांगण, ग्रंथालय, संगणक व्यवस्थेचा अभाव, निवास, भोजन आणि इतर शालेय साहित्याचा अभाव, शिक्षण संस्थेतील राजकीय हस्तक्षेप, संस्थाचालकांचा आर्थिक लाभाचा दृष्टीकोण, पालक व विद्यार्थ्यांचा शिक्षणाबाबत निष्काळजीपणा, इत्यादी कारणांमुळे शिक्षणक्षेत्रात विद्यार्थ्यांच्या विविध स्वरूपाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत.

शासन समाज कल्याण विभाग आणि स्वयंसेवी संस्था यांच्या माध्यमातून चालविण्यात येणाऱ्या आश्रम शाळेतील निवासी असणाऱ्या विद्यार्थ्यांना मोफत निवास,

राहणे, खाणे, सतरंजी, चादर, भोजन, साहित्य, साबण, तेल, गणवेश, शैक्षणिक लेखणी साहित्य, विद्यावेतन आणि इतर भौतिक सुविधा असतात परंतु या सर्व सोयी– सुविधा आश्रमशाळेतील वसतिगृह निवासी विद्यार्थ्यांना मिळत नाहीत किंवा ज्या मिळतात त्या अपुऱ्या स्वरूपाच्या असतात तसेच त्यांना निकृष्ट दर्जाच्या अशा प्रकारच्या सोयी सुविधा असतात म्हणून अनेक विद्यार्थी शाळेत येत नाहीत आणि जे विद्यार्थी शाळेत येतात ते आपले शिक्षण पूर्ण करेपर्यंत अशा निवासी आश्रमशाळेत टिकत नाहीत याची प्रमुख कारणे म्हणजे आश्रमशाळा व्यवस्थापनाची उदासीनता, आर्थिक लाभ, भ्रष्टाचार, यामुळे विद्यार्थ्यांना सोयी– सुविधा आणि सवलती देण्यात अडचणी निर्माण झालेले आहेत आणि त्यातूनच विद्यार्थ्यांच्या समस्या गंभीर बनलेल्या आहेत.

**६) निवासी आश्रमशाळेला मिळणाऱ्या अपुऱ्या अनुदानाची समस्या : –**

महाराष्ट्र शासनाने विविध खाजगी स्वयंसेवी संस्थामार्फत भटक्या विमुक्त जाती व जमातीच्या समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सोयी– सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून १९५३–५४ सालापासून निवासी आश्रमशाळा सुरू केलेल्या आहेत या आश्रमशाळा अतिदुर्गम, डोंगराळ आणि अविकसित अशा भागांमध्ये चालू आहेत या आश्रमशाळा जिल्हा समाज कल्याण विभागाच्या अधिनस्त असून यातील सर्व विद्यार्थ्यांना मोफत राहणे– खाणे आणि गणवेश, लेखणी साहित्य संपूर्ण रीतीने मोफत पणे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी समाज कल्याण विभाग आणि शाळा व्यवस्थापनाची आहे.

महाराष्ट्र शासन आणि समाज कल्याण विभागाकडून अशा आश्रमशाळांना मिळणारे अनुदान अत्यंत तुटपुंजा आहे याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले दिसून येते १९५३ पासून ते आज पर्यंत भरमसाठ महागाई वाढली परंतु आश्रमशाळेच्या निरनिराळ्या बाबीवर मिळणाऱ्या अनुदानात मात्र भरघोस अशी वाढ करण्यात आलेली नाही सध्याच्या वाढलेल्या महागाईमुळे आश्रमशाळा चालविणे अत्यंत कठीण बनले आहे शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातून वस्तीग्रह निवासी विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि मुबलक आशा सोयी– सुविधा देण्यात अडचणी निर्माण होत आहेत मुळातच अशा आश्रमशाळेत प्रवेशित विद्यार्थी हे अत्यंत गरीब कुटुंबातून आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांची सर्वांगीण शैक्षणिक प्रगती घडवून आणण्याची जबाबदारी आश्रमशाळांची जरी असली तरी त्याला मिळणारा शासनाकडूनचा अनुदान तुटपुंजा असल्यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सोयी– सुविधा देण्यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत म्हणून अशा विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या निवासी आश्रमशाळा व पोस्टबेसिक आश्रमशाळांना मिळणाऱ्या निरनिराळ्या बाबीवरील अनुदानात वाढत्या महागाईच्या निर्देशांकानुसार वाढ करून आश्रमशाळा व त्यातील विद्यार्थ्यांची होणारी हेळसांड थांबविली पाहिजे.

**७) सारांश : –**

आश्रमशाळांमधील बंजारा समाजातील विद्यार्थ्यांच्या समस्या या विषयाच्या अभ्यासावरून असे स्पष्ट होते की बंजारा समाज हा संपूर्ण देशात विखुरलेला समाज आहे. गरिबी, दारिद्र्य, अज्ञान, निरक्षरता या समाजात अधिक प्रमाणात पाहावयास मिळते प्रथा– परंपरा जपणारा, बंजारा संस्कृतीवर जिवापाड प्रेम करणारा समाज म्हणून याकडे पाहिले जाते शासनाच्या सोयी सुविधांपासून आणि विकासाच्या प्रवाहात न सामावलेला समाज म्हणून या समाजाची ओळख आहे या समाजातील अनेक मुले–मुली आजही शिक्षणापासून वंचित आहेत या समाजातील साक्षरतेचे प्रमाण अतिअल्प आहे मजुरी, शेतमजुरी, ऊसतोडणीचे फिरते काम, यामुळे बंजारा समाजाची आर्थिक उन्नती– प्रगती झालेली दिसून येत नाही गरीबी, दारिद्र्य यामुळे या समाजातील पालक आपल्या मुलांना उच्चभ्रूसंस्थेतील शाळेत घालू शकत नाही म्हणून ते आपल्या मुलांना निवासी आश्रमशाळांमध्ये शिक्षणासाठी घालतांना दिसून येतात. अज्ञानामुळे पालकांना शिक्षणाचे महत्त्व कळालेले नाहीत परंतु आश्रमशाळांमध्येही मोफत असणाऱ्या दर्जेदार सोयी– सुविधा आणि सवलती विद्यार्थ्यांना मिळत नाहीत. निवासी आश्रमशाळामधून कोणत्याही स्वरूपाच्या उत्कृष्ट असलेल्या सोयी–सुविधा बंजारा समाजातील वसतिगृह निवासी विद्यार्थ्यांना मिळत नसल्यामुळे

त्यांच्यात गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा अभाव दिसून येतो. अनेक आश्रमशाळांमध्ये वेळापत्रकाप्रमाणे नियमित तासिका होत नाहीत. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी पात्रताधारक स्वतंत्र विशेष शिक्षकांचा तुटवडा आश्रमशाळेतून दिसून येतो. घटक चाचणी परीक्षा, प्रगती अहवाल, विद्यार्थ्याकडे विशेष लक्ष, मोफत शैक्षणिक लेखणी साहित्य, मोफत गणवेश इत्यादी बाबींचा अभाव व अनियमितता आश्रमशाळांमधून दिसून येते. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राहण्याची व्यवस्था, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अल्पोपहार– आहार दर्जा निकृष्ट, मनोरंजनाची साधने, क्रीडांगण, ग्रंथालय, अभ्यासिका या बाबीकडे आश्रमशाळा प्रशासनाचे दुर्लक्ष झालेले दिसून येते त्यामुळे आश्रमशाळेतील बंजारा समाजामधील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गळतीचे प्रमाण वाढलेले आहे. आश्रमशाळा संचालकांची खाऊजी वृत्ती या सर्व बाबीसाठी जबाबदार आहे असे यावरून दिसून येते.

सर्वसाधारण आणि मागास समजल्या गेलेल्या बंजारा समाज वर्गासाठी शासनाने ज्या काही योजना कार्यान्वित केलेल्या आहेत त्यांचा लाभ या समाजातील लोकांना फिरते व्यवसाय, निरक्षरता, अज्ञान, गरिबी, दारिद्र्य यामुळे आजतगायत घेता आले नाहीत म्हणून यापुढे विविध योजनांच्या माध्यमातून या समाजाला शैक्षणिक सामाजिक व आर्थिक आधार देऊन विकासाच्या प्रवाहात आणणे गरजेचे आहे आज या समाजातील मुले–मुली मोठ्या प्रमाणात शिक्षणाकडे वळलेले आहेत निवासी आश्रमशाळा ह्या या समाजातील मुलांसाठी आधार बनलेल्या आहेत'त्यासाठी पुरेसे अनुदान, वाढीव शिष्यवृत्ती योग्य शैक्षणिक वातावरण, शैक्षणिक प्रेरणा, आरोग्याच्या सर्व सेवा, आश्रम शाळेत उत्कृष्ट सर्व सोयी–सुविधा, निवासी आश्रमशाळांची सक्षम अधिकाऱ्याकडून तपासणी, भ्रष्टाचाराला पायबंद, पालक जागरूक मिळावे, शाळेचा सुंदर स्वच्छ परिसर, विद्यार्थ्यांची सर्वांगीण सुरक्षितता, गुणवत्तापूर्ण शिक्षण इत्यादी बाबीवर भर दिल्यास काही प्रमाणात या समाजातील विद्यार्थ्यांचे प्रश्न सुटू शकतील.

संदर्भसूची : –

१) शेलकर अभया ––– आश्रमशाळा संहिता, नाशिक लॉ हाऊस औरंगाबाद,– २०१३

२) कोतापल्ले लक्ष्मण–––भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य,विद्या बुक्स, औरंगाबाद

३) महाराष्ट्र शासन– आश्रमशाळा प्रशासन व व्यवस्थापन मार्गदर्शिका

४) खैरनार दिलीप– आधुनिक भारतातील सामाजिक समस्या,जय गणेश प्रिंटर्स,पुणे– २००४

५) खरात शंकरराव––– भटक्या–विमुक्त जाती –जमाती व त्यांचे प्रश्न, गणेश मुद्रणालय, पुणे

६) जिल्हा माहिती कार्यालय परभणी,––– विशेष घटकासाठी वाटा विकासाच्या आणि सामाजिक न्यायाच्या, विशेष घटक योजना स्वरूप व कार्यपद्धती, शासकीय मुद्रणालय औरंगाबाद

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani